नवराष्ट्र
www.navarashtra.com

## सचिन शेंडे यांचे प्रतिपादन ● अर्जुनी मोरगाव येथे आर्थिक समावेशन शिबिर

# योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी आवश्यक

अर्जुनी मोरगाव, (ता.प्र.). केंद्र आणि राज्य सरकारने देशातील शेवटच्या नागरिकाला सरकारी योजनांचा लाभ तत्काळ मिळावा म्हणून बँक आणि लाभार्थी यांना जनधन योजनेच्या माध्यमातून जोडण्याचे काम केले आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अशा असंख्य योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यासाठी बँकेशी संलग्न केले. या योजना सुरळीत चालू ठेवण्यासाठी ग्राहकांना ठराविक काळात ई-केवायसी करणे आवश्यक असते, असे मत रिजर्व बँकेचे विभागीय संचालक सचिन शेंडे यांनी व्यक्त केले.

प्रसन्न सभागृहात आयोजित बँक ऑफ इंडिया शाखा अर्जुनी मोरगाव आरबीआय आणि वित्तीय सेवा विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ई-केवायसी आणि आर्थिक समावेशन शिबिरात प्रमुख मार्गदर्शक म्हणन ते बोलत होते. यावेळी आरबीआय नागपूरच्या उपमहाप्रबंधक अंजना श्यामनाथ, बँक ऑफ इंडियाचे आचलिक प्रबंधक जय नारायण, अग्रणी जिल्हा प्रबंधक नरेंद्र मडावी, गोंदिया शाखेचे मुख्य प्रबंधक धर्मेंद्र कुमार, उमेदचे अभियान व्यवस्थापक रेशीम नेवारे, वित्तीय तालुका व्यवस्थापक दिनेश भेंडारकर, कृषी वित्त विभागाचे अजय गडघे, कृषी वित्त विभागाचे नम्रता ठाकरे, बँक ऑफ इंडिया नागपूरच्या कमल प्रसाद कोरी उपस्थित होते. शेंडे पुढे म्हणाले, आरबीआयच्या वतीने १ जुलै ते ३० सप्टेंबरपर्यंत सामाजिक सुरक्षा योजनाअंतर्गत ई-केवायसी आणि आर्थिक समावेशन शिबिरांचे आयोजन देशभरात होत आहेत.

देशातील दोन लाख ७० हजार ग्रामपंचायत अंतर्गत लाभार्थ्यांना या शिबिरांच्या माध्यमातून डिजीटल फ्राड, सायबर फ्रॉड यावर प्रतिबंध आणून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी ई- केवायसीकरिता क्यूआर कोड, एसएमएस प्रणाली, बँक मित्र किंवा बँकेची संपर्क करून रिकेवायसी आणि आर्थिक समावेशन योजनांच्या लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. संचालन बँक ऑफ इंडियाचे ऋत्विज दप्तरी यांनी ता आभार वरिष्ठ शाखा प्रबंधक मिथुन बारसागडे यांनी मानले.




### पीक कर्जदारांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार

यावेळी पंतप्रधान विमा सुरक्षा योजना आणि पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेश वितरित करण्यात आले. शिबिरात पंतप्रधान सुरक्षा बीमा योजना ७०, पंतप्रधान जीवन ज्योति योजना ६०, अटल पेन्शन योजना ३० आणि ३५० ई- केवायसी लाभार्थ्यांच्या कार्यक्रमस्थळी नोंदनी करण्यात आल्या. शिबिरात बँक प्रतिनिधी, बचत गटांचे स्टॉलद्वारे लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. बचत गट, उत्कृष्ट कर्जदार आणि पीक कर्जदारांचा प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.